प्रेस नोट- मुंढवा पो.स्टे. दि.०६/०९/२०१८

**माथाडीच्या नावाखाली धमकावून खंडणी मागणारे व कामास प्रतिबंध करणाऱ्या आरोपीतांविरुध्द दाखल गुन्हयाबाबत.**

**२/- ऑक्सफर्ड ग्रुप व गोदरेज कंपनी यांच्यामध्ये स.नं.९ ते १४ हिस्सा नं ७१ केशवनगर मुंढवा या ठिकाणी बांधकाम प्रकल्प चालू असून तेथील बांधकामाचे कॉन्ट्रॅक्ट मिलेनियम इंजिनिअरींग ॲन्ड कॉन्ट्रॅक्टर्स प्रा.लि. या कंपनीस दिलेले असून, सदर ठिकाणी बांधकाम (गृहप्रकल्प) चालू आहे.**

ऑक्सफर्ड ग्रुप व गोदरेज कंपनी यांचे बांधकामाच्या प्रोजेक्टचे काम मिलेनियम इंजिनिअरींग ॲन्ड कॉन्ट्रॅक्टर्स प्रा.लि. ही कंपनी करीत असून, सदरची कंपनी चालू असलेल्या बांधकामासाठी व अंतर्गत सजावटीकरीता लागणारे साहीत्य बाहेरुन मागविते व त्या साहीत्याचे लोडींग-अनलोडींग करण्याच्या कामाकरीता माथाडी महामंडळाकडून कामगार नियुक्तीचे अधिकार ऑक्सफर्ड ग्रुपकडे असल्याने ऑक्सफर्ड ग्रुपने गणपत मधुकर कारंडे यांच्या विक्रांत एंटरप्राइजेस या संस्थेस माथाडीचे काम दिले होते. परंतु मागील दोन ते तीन महिन्यापासून विक्रांत एंटरप्राइजेस तर्फे माथाडीचे काम समाधानकारक होत नसल्याने त्यांचेकडील माथाडीचे काम ऑक्सफर्ड ग्रुपकडून दि.०४/०९/२०१८ रोजी लेखी कळवून रद्द केलेले आहे व त्या ठिकाणी **ओम माथाडी हमाल विकास संस्थेचे श्री.विजय महादेव गायकवाड यांना तेथील माथाडीचे काम दिलेले असून** त्यांचे माथाडी महामंडळाकडील रजिस्ट्रेशन प्रक्रीया सुरू असताना, **दि.०६/०९/२०१८ रोजी ११.०० वा च्या सुमारास मिलेनियम इंजिनिअरींग ॲन्ड कॉन्ट्रॅक्टर्स प्रा.लि. या कंपनीचे प्रोजेक्ट मॅनेजर विजय लक्ष्मण जाधव, रा. रिदम रो हाउस, नं. ७, कदम वाक वस्ती ,लोणी काळभोर, पुणे** व त्यांचे सहकारी बलभीम जाधव(सुपरवायझर), शैलेश नामदेव गायकवाड(सिक्युरीटी), गणपत शिंदे(ठेकेदार) असे गोदरेज मिलेनियम केशवनगर मुंढवा या साईटवर हजर असताना त्यांच्याकडे बांधकामाचे इंटेरियर करीता लागणारे साहीत्य (जिप्सम) घेवून आलेला मालाचा ट्रक नं.एम एच ०४ जीसी ५५६० हा **आरोपी नामे १) बंटी राजू शेळके रा.हडपसर रेल्वे स्टेशन मुंढवा पुणे २) शेखर भागुराम पिसाळ रा.भीमनगर, मुंढवा, पुणे** यांनी **राहूल जाधव याचे सांगणेवरुन** कंपनीचे गेट जवळ अडवून तो ट्रक गेटच्या आत व आतिल ट्रक बाहेर घेवून जाण्यास प्रतिबंध करुन **'आम्हाला माथाडीचे कंत्राट दया नाहीतर आम्हास आता २५,०००/- रू दया, त्याशिवाय आम्ही तुमच्या गाडया आत व आतील गाडया बाहेर सोडणार नाही', असे धमकावून जिवे मारण्याची धमकी दिल्याने** मिलेनियम इंजिनिअरींग ॲन्ड कॉन्ट्रॅक्टर्स प्रा.लि. कंपनीचे प्रोजेक्ट मॅनेजर श्री. विजय लक्ष्मण जाधव यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **मुंढवा पोलीस ठाणे येथे गु.र.नं. २१४/२०१८ भा.द.वि. कलम- ३४१,३८७,५०६(२),३४ व क्रिमीनल लॉ अमेंडमेंन्ट ॲक्ट १९३२ चे कलम ७ प्रमाणे दि.०६/०९/२०१८ रोजी गुन्हा दाखल** केलेला असून, सदर गुन्हयामधील आरोपीतांचा लागलीच शोध घेवून आरोपी नामे १) बंटी राजू शेळके रा.हडपसर रेल्वे स्टेशन मुंढवा पुणे २) शेखर भागुराम पिसाळ रा.भीमनगर, मुंढवा, पुणे यांना अटक केलेली आहे.

नमूद अटक आरोपी यांचे प्रमाणे माथाडीच्या नावाखाली (माथाडी बोर्डाकडे रजिस्ट्रेशन व टोळी नंबर सह ओळखपत्र न मिळविता) कोणी कामामध्ये अडथळा अथवा बेकायदेशीरमार्गे आर्थिक मागणी करुन व्यवसायीकांची पिळवणूक करीत असतील अशा घटना घडलेस अथवा घडत असलेस व नमूद आरोपीविरुध्द आणखीन काही तक्रारी असलेस मुंढवा पोलीस स्टेशनची संपर्क साधून तक्रारी कराव्यात जेणेकरुन त्यांच्याविरुध्द कठोर योग्यती प्रतिबंधक कारवाई करणे सुलभ होवून गुंड प्रवृत्तीच्या गुंडांचे समुळ उच्चाटन करता येईल याबाबत मुंढवा पोलीस स्टेशनच्या वतीने आवाहन करण्यात येत आहे.